Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 20 October 2024

Time: 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २० ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद मोदी आज दुपारी वाराणसी इथं सहा हजार एकशे कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि उद्घाटन करणार आहेत. आर. जे. शंकर नेत्र रुग्णालयाचं ते उद्घाटन करतील आणि दुपारी साडेचार वाजता वाराणसीतील सिगरा क्रीडा संकुल इथं विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही त्यांच्या हस्ते होणार आहेत. आग्रा, दरभंगा आणि बागडोगरा विमानतळांच्या नवीन नागरी केंद्रांची पायाभरणी पंतप्रधान दूरस्थ पद्धतीनं करणार आहेत.

****

शिक्षण क्षेत्रात झालेल्या बाजारीकरणामुळं शिक्षणाच्या दर्जावर विपरीत परिणाम होत असल्याचं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. राजस्थान मधल्या सीकर इथल्या कार्यक्रमात ते बोलत होते. शिक्षण हे कधीच उत्पन्नाचं साधन नव्हतं, तर ते त्यागाचं, परोपकाराचं आणि समाज सक्षम घडवण्याचं माध्यम होतं. शिक्षण क्षेत्राचा व्यवसाय होणं, हे राष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीनं पोषक नसल्याचं धनखड यावेळी म्हणाले.

****

दिवाळी आणि छट पूजा सणांच्या निमित्तानं होणारी गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेनं एकूण ५७० विशेष रेल्वेंची घोषणा केली आहे. या विशेष गाड्या राज्यातल्या मुंबई, पुणे, नागपूर आदी स्थानकांमधून सुटणार आहेत. उत्तरेकडच्या दानापूर, गोरखपूर, छपरा, बनारस, समस्तीपूर, आसनसोल, आगरतळा, संत्रागाछी आदी ठिकाणी जाण्यासाठीही विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत. या रेल्वे गांड्यांसोबतच मध्य रेल्वेद्वारे लातूर, सावंतवाड़ी रोड, नागपुर, पुणे, कोल्हापुर, नांदेडसह महाराष्ट्रातील अन्य ठिकाणांचा प्रवास करणा-या प्रवाश्यांसाठी १०८ रेल्वे गाड्यांचं नियोजन करण्यात आलं आहे.दक्षिणेकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वे

करीमनगर, कोचुवेली, काझीपेट, बंगळुरू आणि इतर ठिकाणासाठीही रेल्वेगाड्या चालवल्या जाणार आहेत, अशी माहिती मध्य रेल्वेनं प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे. या विशेष रेल्वेगाड्यांचं आरक्षण सुरु झालं आहे.

****

राज्य सरकारतर्फे होत असलेला खर्च आणि एकंदर कारभार आणि राज्याच्या एकूण अर्थव्यवस्थेवर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी टीका केली आहे. त्या काल मुंबई इथं वार्ताहर परिषदेत बोलत होत्या. राज्य आर्थिक संकटात असून सरकारनं मोठ्या प्रमाणावर कर्जं घेतली आहेत असं त्या म्हणाल्या.

****

लोकनेता गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचा गाळप हंगाम २०२१–२२ मधील देय असलेल्या, प्रति टन चार रूपयां पैकीच्या, प्रतिटन तीन रुपयांचा भरणा करण्याचे निर्देश शासनानं दिले आहे. अन्यथा संबंधित साखर कारखान्यांना, यंदाचा हंगाम २०२४–२५ साठीचा ऊसगाळप परवाना देण्यात येणार नाही, असं साखर आयुक्त कुणाल खेमनार यांनी सर्व साखर कारखान्यांना कळवलं आहे. राज्यातल्या ऊसतोड कामगारांना विविध कल्याणकारी आणि सामजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देण्याकरता ही योजना राबवण्यात येत असल्याचं त्यांनी नमुद केलं आहे.

****

बंगळुरू इथं भारत आणि न्यूझीलंड दरम्यान सुरु असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात  आज पाचव्या आणि अखेरच्या दिवशी पावसामुळे उशिरा सुरुवात झाली. शेवटचं वृत्त हाती आलं तेंव्हा न्यूझीलंडनं एक बाद १७ धावा केल्या होत्या. सामना जिंकण्यासाठी न्यूझीलंडला १०७ धावांची आवश्यकता आहे. भारताचा पहिला डाव ४६ धावांवर संपुष्टात आला होता, दुसऱ्या डावात काल भारतानं ४६२ धावा केल्या.

****

तुळजापूरचे माजी आमदार नरेंद्र बाबुराव बोरगावकर यांचं आज पहाटे पुणे इथं वृद्धापकाळानं निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. त्यांनी लातूर बीड धाराशिव या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं होतं. उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे ते काही काळ अध्यक्ष होते. तुळजापूर तालुक्यातल्या नळदुर्ग इथल्या बालाघाट शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव म्हणून ते कार्यरत होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज संध्याकाळी पाच वाजता तुळजापूर येथील मोतीझरा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

****

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी आज वीजा आणि जोराच्या वाऱ्यांसह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. भारतीय हवामान खात्यातर्फे अहिल्यानगर जिल्ह्यात काल प्रमाणे आजही वीजांच्या कडकडाटांसह वादळी वारा आणि अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. जिल्ह्यासाठी ''ऑरेंज अलर्ट'' जारी करण्यात आलेला आहे. नदी अथवा ओढे नाल्यांवरच्या पुलावरुन पाणी वाहत असल्यास पुल ओलांडू नये, असं आवाहन अहिल्यानगर प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

****

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन गांजाचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. थायलंडच्या बँकॉक इथून आलेल्या प्रवाशानं खेळणी आणि अन्नपदार्थांच्या खोक्यात जवळपास नऊ किलो वजनाचा हा गांजा लपवला होता. याचं मूल्य अंदाजे आठ कोटी रुपये असून या प्रकरणी प्रवाश्याला ताब्यात घेण्यात आलं असल्याचं तसपास यंत्रणेनं म्हटलं आहे.

****

पैशांचा पाऊस पाडण्याचं आमिष दाखवून सुमारे ४५ लाख २३ हजार रुपये उकळल्या प्रकरणी बीड इथं सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी २४ लाख रुपये रोख आणि उर्वरित २१ लाख २३ हजार रुपये ऑनलाईन माध्यमातून हस्तांतरित करण्यात आले होते.

****